ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख ११ नोव्हेंबर, १९५२ | अंक ४३

## विविध माहिती

**सोयाबीनच्या दुधाचा कारखाना**—सोयाबीनपासून दूध तयार करून तें टिकाऊ स्वरूपांत डबाबंद करण्याचा कारखाना सिंगापूर येथें लवकरच सुरू होईल. ह्या कारखान्याच्या उभारणीसाठीं ५२,००,००० रुपये भांडवल लागलें आहे. दुधाशिवाय चिनी पद्धतींचे इतरही खाद्यपदार्थ डबाबंद करण्यांत येणार आहेत.

**उत्तर-प्रदेशांतील कापसाची लागवड**—उत्तर प्रदेशांत अधिक पीक देणाऱ्या कापसाचें बियाणें तयार करण्याचे प्रयोग सध्या चालू आहेत. राज्य सरकारनें कापसाच्या लागवडीसाठीं १९५०–५१ सालीं १०,००० मण बियाणें वाटलें, त्यापैकीं १,००० मण चांगल्या प्रकारच्या कापसाचें होतें. ह्या वर्षी पाटबंधाऱ्यानें भिजणाऱ्या २०,००० एकर जमिनींत कापसाची लागवड करण्यांत आली.

**द. अमेरिकेंत जपानची स्पर्धा**—द. अमेरिकेंतील बाजारपेठांतून ब्रिटनला जपानची स्पर्धा चांगलीच जाणवूं लागली आहे. शिवण्याचीं यंत्रें, सायकली, फौंटनपेन्स व ट्रॅक्टर्स पुरविण्याची बरीच मोठीं कंत्राटें जपाननें ब्रिटनशी स्पर्धा करून मिळविलीं आहेत. जपानी मालाच्या किंमतीही ब्रिटिश मालापेक्षा बऱ्याच कमी आहेत.

**हत्तींच्या निर्यातीवरील निर्बंध उठणार**—भारतांतून दरवर्षी ७५ हत्ती निर्यात करतां येतील असें बंधन आतांपर्यंत होतें. आतां हा निर्बंध रद्द करण्यांत येणार आहे असें समजतें. भारतांत हत्ती पुष्कळ असून त्यामानानें त्यांची निर्यात बेताचीच आहे, असें कारण सांगण्यांत येत आहे.

**झेकोस्लोव्हाकिआची भारताला देणगी**—झेकोस्लोव्हाकिआच्या मध्यवर्ती कामगार-संघटनेनें भारतीय मध्यवर्ती कामगार संघटनेला एक देणगी पाठविली आहे. ही देणगी म्हणजे दंतवैद्यकाच्या साधनानें परिपूर्ण असलेली एक मोटारगाडी आहे.

**टेलिव्हिजनवरील जाहिराती**—अमेरिकेंत टेलिव्हिजनवरील जाहिरातींचा झपाट्यानें प्रसार होत आहे. १९५१ सालीं टेलिव्हिजनवरील जाहिरातींच्या कार्यक्रमासाठीं ३० कोटी डॉलर्स जाहिरातदारांनीं खर्च केले होते. १९५२ सालीं हा आकडा ४१·५ कोटी डॉलर्सपर्यंत पोंचेल. आणखी दोन वर्षांत हा खर्च ७५ कोटी डॉलर्सपर्यंत वाढेल. त्या सुमारास अमेरिकेंतील २·७ कोटी घरांमधून टेलिव्हिजनचे सेट्स असतील आणि त्यांना जाहिराती पोंचविण्यासाठीं इतका खर्च करावा लागेल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**कम्युनिस्ट पक्षाला तरुणाची मरणोत्तर मदत**—कलकत्ता येथील एका तरुणानें धांवत्या गाडीपुढें उडी घेऊन आत्महत्त्या केली. त्याच्या खिशांत एक चिठ्ठी होती. तींत अशी सूचना केली होती कीं, बँकेंत आपल्या नांवावर असणाऱ्या ७,००० रुपयांपैकीं ३,००० रुपये हिंदी कम्युनिस्ट पक्षाला देण्यांत यावेत.

**ऑस्लोमधील भारतीय प्रदर्शन**—भारतीय मालाचें एक प्रदर्शन ऑस्लो ( नॉर्वे ) येथें नुकतेच उघडण्यांत आलें. प्रदर्शन पहाण्यासाठीं पहिल्या तीन दिवसांतच ५,००० वर लोक येऊन गेले. नॉर्वे आणि भारत ह्यांच्या दरम्यान तांत्रिक साह्याचा करार झालेला आहे. प्रदर्शनाच्या निमित्तानें दोन देशामधील दळणवळण अधिक वाढण्यास मदत होईल.

**किर्लोस्कर इलेक्ट्रिक**—ह्या कंपनीला ३० जून, १९५२ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षात १,३७,५३९ रुपये नफा झाला आहे. घसाऱ्याची मागील बाकी वजा करता हा नफा आहे. गुडविल, प्राथमिक खर्च, इत्यादींबाबत आजवर झालेला खर्च लक्षांत घेऊनही ५९,००० रु. नफा पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढण्यांत आला आहे.

**जपानच्या मोटार कारखान्यांना मदत**—जपानमधील मोटारींच्या ३१ कारखान्यांचें उत्पादन वाढावें म्हणून जपानच्या सरकारनें त्यांना १,४०,००,००० येन मदत म्हणून देण्याचें ठरविलें आहे. जपानमध्यें हल्लीं ब्रिटिश, अमेरिकन, फ्रेंच व इटालिअन बनावटीच्या गाड्या मोठ्या प्रमाणावर आयात होतात. ह्या परदेशी गाड्यांच्या किंमतींच्या मानानें जपानी गाड्यांच्या किंमती फार असतात; कारण त्यांना महाग पोलाद परदेशाकडून आयात करावें लागतें.

**हवेवर राहूं शकणारी मुलगी**—कूर्गमधील एका कॉफीच्या मळ्यांत धनलक्ष्मी नांवाची एक मुलगी गेल्या वर्षभर अन्नपाण्यावांचून राहिली आहे, असें समजतें. ह्या मुलीचें वजन १०० पौंड आहे. ह्याची चिकित्सा करण्यासाठीं शास्त्रज्ञांचें व डॉक्टरांचें एक मंडळ धाडण्यांत यावें, अशी सूचना करण्यांत आली आहे.

**मुलगा का मुलगी ?**—गर्भवती स्त्रीच्या लाळेचें रासायनिक पृथःकरण करून, वाढणारा गर्भ मुलगा आहे कीं मुलगी आहे तें वर्तविण्याचा शोध दोघा अमेरिकन डॉक्टर्सनीं लावला आहे. ह्या डॉक्टर्सनीं २७३ गर्भवती स्त्रियांच्या बाबतींत आपला अंदाज सांगितला आणि २६३ स्त्रियांच्या बाबतींत तो खरा ठरला असल्याची बातमी आहे.

**खजुराची आयात**—इराककडून खजुराची आयात मोठ्या प्रमाणावर करणाऱ्या देशांत भारत मोडतो, असें समजतें. १९५१ च्या हंगामांत भारतानें इराककडून ६७,००० टन खजूर आयात केला. भारताशिवाय ब्रिटन, अमेरिका, ईजिप्त, जॉर्डन व सीरिआ इतके देश इराकी खजुराची आयात करतात.

**महात्माजींचा जीवनपट**—मि. गॅब्रिअल पास्कल ह्यांनीं महात्माजींच्या जीवनाचा बोलपट काढण्याची कल्पना सोडून दिली आहे, अशी बातमी मध्यंतरी पसरली होती. परंतु मि. पास्कल ह्यांनीं ह्या वार्तेचा इनकार केला असून हा बोलपट आपण अपेक्षेपेक्षा लवकर तयार करूं, असें म्हटलें आहे.

**बिहारमधील छोटे पाटबंधारे**—१९५२ च्या सप्टेंबर महिनाअखेर बिहार सरकारनें ३३,३१,४९३ रुपये खर्च करून ७,७९५ छोट्या पाटबंधाऱ्यांचीं कामें पुरीं केलीं. अशा कामासाठीं १ कोट रुपये मंजूर करण्यांत आलेले आहेत. ह्या पाटबंधाऱ्यांमुळें ३५,९०० एकर जामिनीला हुकमी पाणीपुरवठा होणार आहे.

**आगगाडीचे नवे डबे**—स्वित्झरलंडकडून मागविलेले ४ नवे आगगाडीचे डबे नुकतेच मुंबई बंदरांत दाखल झाले आहेत. दोन डबे इंटरचे असून दोन दुसऱ्या वर्गाचे आहेत. आतांपर्यंत ३० अशा प्रकारचे डबे आले आहेत. डब्यांचें वजन प्रत्येकीं ३६ टन आहे.

**प. जर्मनीमधील टेलिव्हिजन**—१९५७ ह्या सालअखेर प. जर्मनींत टेलिव्हिजनचे कार्यक्रम प्रसृत करणारीं ३७ केंद्रें उभारण्यांत येणार आहेत. बर्लिन, हॅम्बुर्ग, कलोन, फ्रँकफर्ट ह्या शहरांना जोडणारी केंद्रांची सांखळीच त्यामुळें निर्माण होईल.

**निझाम दिल्लींतील इमारत घेणार?**—दिल्लींतील 'हैद्राबाद हाउस' ही इमारत तिच्या नोंदलेल्या किंमतीला विकत घेण्याची तयारी निझामानें दाखविली आहे. इमारतीची किंमत ३६,००,००० रुपये असून आजच्या बाजारभावानें तिची किंमत ९५ ते ९७ लाख रुपये होते. इमारतीची देखभाल करण्यासाठीं हैद्राबाद सरकारला दरवर्षी सुमारें १,२०,००० रुपये खर्च येतो.

**कृत्रिम अन्नपदार्थांचें भोजन**—भारत सरकारच्या नैसर्गिक साधन संपत्तिखात्याचे उपमंत्री, श्री. के. डी. मालवीय, ह्यांच्याकडे त्यांचे कांहीं मित्र भोजनाला गेले असतां त्यांना तांदूळ आणि दही वाढण्यांत आलें. हा तांदूळ टॅपिओकापासून आणि दही वनस्पतिजन्य होतें. उपमंत्र्यांनीं हे पदार्थ म्हैसूर येथील अन्नसंशोधन संस्थेकडून आणले होते. ह्या पदार्थांची निर्मिति मोठ्या प्रमाणावर करण्याचा विचार सरकार करीत आहे.

**ट्यूब विहिरींतून मासे बाहेर पडले**—दिल्ली जवळील शाहादरा नांवाच्या गांवीं खोदलेल्या एका ट्यूब वेलमधून पाण्याबरोबर मासे बाहेर पडत असल्याचें समजतें. विहीर १०० फूट खोल असून माशांची लांबी तीन ते चार इंच आहे. त्यांचा रंग गडद तांबडा आहे. हे मासे खाण्यालायक आहेत किंवा नाहीं तें माहीत नाहीं. माशांची संख्या शेकडोंनीं मोजण्याइतकी आहे.

**सरकारी मालकीचा पोलादाचा कारखाना**—बंगलोर येथें भारतीय सरकार आपल्या मालकीचा लोखंडाचा व पोलादाचा एक कारखाना उभारणार असल्याचें समजतें. कारखान्याला ८० कोटी रुपये भांडवल लागेल. कारखाना चालू झाल्यावर दरवर्षी ३,००,००० टन लोखंड व पोलाद निर्माण होईल असा अंदाज आहे. कारखान्यासाठीं लागणारें तांत्रिक ज्ञान कांहीं परदेशीयांकडून घेण्यांत येईल.


# मध्यप्रदेश को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना-१९११

हेड ऑफिस—नागपूर शहर (टिळक पुतळ्याजवळ)

**अध्यक्ष—सर माधवराव देशपांडे,** के. बी. ई.

मध्यप्रदेशांतील सहकारी चळवळीच्या केन्द्रस्थानीं असलेली व कित्येक वर्षें लोकादरास व ठेवीदारांच्या विश्वासास पात्र झालेली

**एकमेव प्रादेशिक सहकारी बँक**

शाखा : सिताबर्डी-नागपूर, अमरावती, खामगांव, मलकापूर, बुलढाणा, चांदा, बैतूल, इटारसी, हरदा, पिपारिया, नरसिंगपूर, जबलपूर, मंडला व राजनांदगांव.

★

| | | |
|---|---|---|
| अधिकृत हिस्से-भांडवल | रु. | २०,००,००० |
| जमा झालेलें हिस्से-भांडवल | रु. | १०,९७,००० |
| गंगाजळी | रु. | १४,५१,००० |
| एकूण ठेवींची रक्कम | रु. | २,१५,५५,००० |
| सरकारी रोखे | रु. | ७२,९१,००० |

**खेळतें भांडवल रु. ३ कोटींचे वर.**

आर्थिक दृष्ट्या पूर्ण सुरक्षित.

आकर्षक व्याजाचे दर.

सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात

— व —

इतर सर्व बँकिंगचे व्यवहार करण्यांत येतात.

★

मागील सहा वर्षांपासून हिश्श्यांवर ५ टक्के
" इन्कमटॅक्स माफ "
मुनाफा वांटण्यांत येत आहे.

**आपल्या मूल्यवान् वस्तू व दागिने आमच्या "सेफ डिपॉझिट व्हॉल्ट" मध्यें ठेवून निर्धास्त व्हा.**

वैयक्तिक तिजोऱ्यांची (Lockers) व्यवस्था केली आहे.

सविस्तर माहिती समक्ष भेटींत अथवा पत्रद्वारें

★

**नि. स. देव,**
मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. १२ नोव्हेंबर, १९५२



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## उच्च रहाणीच्या दर्जाचा आर्थिक पाया बळकट हवा

### उत्पादनवाढ आणि मर्यादित कुटुंबें

### श्री. ठाकूर ह्यांचा व्यावहारिक इषारा

युनायटेड कमर्शिअल बँक लि. चे जनरल मॅनेजर, श्री. बी. टी. ठाकूर, ह्यांनीं कलकत्ता विद्यापीठाची ताराप्रसाद खैतान व्याख्यानमाला गुंफली. त्यावेळीं त्यांनीं दिलेलीं व्याख्यानें यु. क. बँक रिव्ह्यूच्या ताज्या अंकाची पुरवणी म्हणून छापून प्रसिद्ध झालीं आहेत. ही व्याख्यानमाला गुंफण्यास श्री. ठाकूर ह्यांना विद्यापीठानें विनंति केली, हीं शास्त्र आणि व्यवहार यांची संगति जोडली जाण्याचें महत्त्व विद्यापीठाला पटलें असल्याची साक्ष आहे. शिक्षक आणि प्रत्यक्ष व्यवहारांत गुंतलेले लोक, ह्यांनीं वारंवार एकत्र येऊन विचारविनिमय करण्याची प्रथा पडणें अगत्याचें आहे. केवळ पाठ्य पुस्तकांतच ज्ञान समाविष्ट झालेलें नसतें; व्यावसायिकांचा अनुभवहि विचारांत घेतला गेला पाहिजे.

महागाईमुळें आज रहाणीचा दर्जा खालावत चालला आहे, आणि मध्यमवर्गीयांची तर फारच कुचंबणा झाली आहे. शिक्षण घेऊनहि मध्यमवर्गीय मनुष्यास नीट रहाता येत नाहीं आणि त्याचेकडे दुर्लक्ष करण्यांत आलें तर समाजव्यवस्था कोलमडून टाकणारे आघात तिचेवर होतील. जाणत्या लोकांनीं ह्या प्रश्नाचा गंभीर विचार करून, सामान्य माणसाच्या रहाणीचा दर्जा प्रत्यक्ष अनुभवास उतरेल एवढा तांतडीनें वाढविणाऱ्या योजना आंखण्यास मदत करून, प्रत्यक्ष उपाय केले जात असल्याची प्रचीति द्यावी आणि आशा व विश्वास ह्यांची निर्मिति करावी, अशी सूचना श्री. ठाकूर ह्यांनीं केली आहे. भारतीयांचें दरमाणशीं वार्षिक उत्पन्न अत्यल्प आहे, आणि अगदीं प्राथमिक स्वरूपाच्या मानवी गरजा भागविण्यासहि तें अपुरें आहे. अन्नपुरवठ्याचे बाबतींतहि आपण मागासलेले आहों. त्यामुळें आपले लोक दुर्बल, रोगी, अल्पायुषी, निरुत्साही, असे आढळतात. ह्यांत तात्काळ सुधारणा दिसली नाहीं तर क्रांतीला आमंत्रण मिळणार आहे. उपयोगासाठीं उपलब्ध असलेल्या जिनसा आणि ज्यांत त्या जिनसांची वाटणी करावयाची त्या लोकांची संख्या, ह्या दोन गोष्टींवर प्रत्येक व्यक्तीच्या वांट्यास किती जिनसा येणार, हें अवलंबून रहातें. म्हणजे, जिनसांचें उत्पादन वाढलें पाहिजे आणि वांटेकऱ्यांची संख्या कमी झाली पाहिजे. रहाणीच्या दर्जाचा प्रश्न हा अंकगणिताचा प्रश्न आहे; त्यांत केवळ भावना किंवा ध्येयवाद ह्यास जागाच नाहीं. भारतांतील प्रत्येक कुटुंबांत सरासरीनें सहा जण असतात. त्यांपैकीं मिळवते एक, फार तर दोन असतात. त्यामुळें कुटुंबांचा आकार वाढला म्हणजे रहाणीचें मान खालावतें. पाश्चात्य देशांतील कुटुंबामधील घटकसंख्या सरासरीनें तीन असते. नवरा-बायको दोघेंहि बहुधा मिळवते असल्यानें अवलंबून असणारांची संख्या एक एवढीच असते; भारतांत ती पांच भरते. पाश्चात्य देशांत बहुतेक कुटुंबांतील गृहिणी कामें करून कुटुंबाच्या प्राप्तींत भर घालीत असतात. कुटुंबाचा आकार मर्यादित करणें व स्त्रियांनीं कुटुंबाची प्राप्ति वाढविणें, ह्या दोन दिशांनीं भारतांत सुधारणा होणें आवश्यक आहे.

समाजाच्या प्राप्तीपैकीं बरीच मोठी रक्कम कर व पट्ट्या ह्यांचे स्वरूपांत जमा केली जाऊन, त्यांतून संरक्षण, शांतता आणि कांहीं सार्वजनिक सोई ह्यांवर खर्च करण्यांत येतो. सर्व जनतेंत नागरी गुणांचा विकास झाला असेल तर युद्धें टळून पोलीस, न्याय आणि राज्यकारभार ह्यांवर होणारा कांहा मोठा खर्च टळूं शकेल आणि अनुत्पादक रीतीनें गुंतलेले लोक उत्पादक कामास उपलब्ध होतील. सरकारी खर्चांत ज्या मानानें अशा रीतीनें बचत होईल, त्या मानानें रहाणीचा दर्जा वाढण्यास मदत होईल. प्रत्येकाच्या वाट्यास यावयाच्या जिनसांत वाढ होणें म्हणजेच रहाणीचा दर्जा सुधारणें होय. म्हणजे, अंतर्गत उत्पादन वाढविलें पाहिजे अथवा आयात वाढविली पाहिजे. परंतु, कोणताहि देश आपल्यास फुकट माल देणार नाहीं; तो मोबदला मागणारच. फार तर तो उधार किंवा उसनवारीनें देईल. म्हणजे, आज नाहीं तर उद्यां उत्पादन वाढविल्याविना गत्यंतर नाहीं.

राष्ट्रीय उत्पादनवाढीची अशा रीतीनें चिकित्सा करून, श्री. ठाकूर ह्यांनीं उत्पादन सुधारण्यास आवश्यक अशा प्रमुख बाबींचें तपशीलवार विवेचन केलें. (१) लोकांना देण्यास पुरेसें अन्न व पक्क्या मालांत रूपांतर करण्यास पुरेल एवढा कच्चा माल उपलब्ध असला पाहिजे. प्रत्येक जातीचा कच्चा माल पुरेसा नसला तरी चालेल, परंतु आवश्यक तो कच्चा माल मिळविता येण्याजोगी इतर प्रकारच्या कच्च्या मालाची सुबत्ता पाहिजे. पुरेसा कपास नसेल, तर पुरेसें कापड मिळूं शकणार नाहीं; पुरेसें धान्य नसेल तर लोकांचें पोट भरणार नाहीं. कच्च्या मालाचा पुरेसा पुरवठा किंवा तो उपलब्ध करता येण्याची शक्यता ही रहाणी सुधारण्याच्या प्रश्नाची पहिली आवश्यक बाब आहे. (२) टूल्स आणि मशीन्स हीं सुधारलेल्या पद्धतींचीं असतील, तरच कच्च्या मालाचें पक्क्या मालांत किफायतशीरपणें रूपांतर करतां येईल. हातकताईनें दर माणशीं दर ताशीं जितकें सूत निघेल तें यांत्रिक चातीवरील सुताचे मानानें अत्यल्प असणार, हें उघड आहे. हातमागापेक्षा गिरणींतील ऑटोमॅटिक माग अधिक कार्यक्षम असणारच. (३) ही यंत्रसामुग्री उपयोगांत आणणारांना तिचें चांगलें ज्ञान असावयास पाहिजे; त्यांतून अधिकांत अधिक व ज्यास्त चांगलें उत्पादन त्यांना काढतां आलें पाहिजे. ते अज्ञानी असतील किंवा शिकण्याची त्यांची इच्छा नसेल, अथवा यंत्रें चालविण्यांत ते तन्मय होत नसतील, तर यंत्रसामुग्री कितीहि उत्कृष्ट असली तरी त्यांच्या पूर्ण क्षमतेइतकें उत्पादन त्यांतून मिळणें अशक्य होईल. (४) यंत्रें चालविण्यासाठीं स्वस्त व मुबलक प्रेरक शक्ति पाहिजे. कोळसा, तेल, जलनिर्मित वीज, ह्या सर्व किंवा त्यांपैकीं कांहीं बाबतींत देश समृद्ध असेल तर शेती, उद्योगधंदे व वहा-

तूक यांचें यांत्रिकीकरण शक्य होईल. (५) ह्या चारहि बाबींपेक्षा काम करण्याची तयारी सर्वांत महत्त्वाची आहे. कच्चा माल भरपूर आहे, यंत्रसामुग्री अबाधित आहे, ती चालविण्याचें ज्ञान आहे; पण कष्टाची तयारी नसेल तर कांहीं उपयोग नाहीं आणि राहणीचा दर्जा हें प्रत्यक्षांत कधींच न उतरणारें केवळ एक स्वप्न राहील.

कच्च्या मालाचे पुरवठ्याचे बाबतींत भारत भाग्यवान् आहे. परंतु, ही परिस्थिति कारणीं लावली पाहिजे. हिंदी लोकसंख्येची वाढ उपलब्ध मालाच्या मानानें द्रुतगतीनें होत आहे, ही मोठीच चिंतनीय गोष्ट आहे. तिच्या गंभीर परिणामांची सामान्य जनतेस आज कल्पनाहि नाहीं. आरोग्य आणि वैद्यकीय मदत ह्या बाबतींत वाढतें लक्ष दिल्यानें, मृत्युसंख्या कमी होऊन लोकसंख्या आणखी फुगण्यास मदत होईल, आणि रहाणीचा दर्जा वाढविण्याचे प्रयत्न निष्फळ ठरतील. उत्पादनवाढीचा एकमेव तोडगा सांगणाऱ्या श्री. ठाकुरांना कुटुंबनियोजनाचा प्रश्न चिंतनीय वाटत आहे, ह्यावरून त्या प्रश्नाचें गांभीर्य स्पष्ट होईल. मशिन टूल्स व यंत्रसामुग्री ह्याबाबत बरीच सुधारणा आवश्यक आहे. तांत्रिक ज्ञानांत गेल्या पन्नास वर्षांत फार मोठी वाढ झाली आहे आणि त्यामुळें यंत्रांची गति व उत्पादनशक्ति फारच सुधारली आहे. ह्या ज्ञानाची व उत्पादनशक्तीची बरोबरी आपणांस करावयाची आहे. त्यासाठीं अतिशय मोठ्या भांडवलाची आवश्यकता आहे आणि तें देशांतच उभारलें गेलें पाहिजे. बचत करून ती शिलक टाकणारा मध्यमवर्ग आज जवळजवळ नामशेष झाला असून, कामगार व शेतकरी वर्ग ह्यांकडेच त्यासाठीं आपणांस वळलें पाहिजे. त्यांचेजवळील पैसा आकर्षित करून तो शेती व उद्योगधंदे ह्यांच्या कारणीं लावला पाहिजे. परदेशी भांडवलाच्या उपयुक्ततेस आणि निर्धास्तपणास मर्यादा आहेत, परंतु मोठ्या प्रमाणावर मदत करणाऱ्या लोकशाही राष्ट्रांची आपण मैत्री संपादन करून ती वाढविली पाहिजे, असें श्री. ठाकूर ह्यांनीं प्रतिपादन केलें आहे.

आधुनिक पद्धतीच्या उत्पादनाचे सर्व दुवे कार्यक्षम रीतीनें व सहकार्यानें काम करीत राहिले नाहींत, तर उत्पादन पुरेशा प्रमाणांत व पुरेसें चांगलें होणार नाहीं. कामगारविषयक परिस्थितीवरील ह्या संबंधांतील श्री. ठाकूर ह्यांचे विचार अगदी स्पष्ट आहेत. मालक–कामगारविषयक सध्याच्या कायद्यांत कामगारांच्या हक्कांवर जोर देण्यांत आला आहे, पण त्यांच्यावरील किमान जबाबदाऱ्यांचा उल्लेख फारच थोडा आहे. कामगिरीचा रोजगाराशी मेळ बसविला नाहीं आणि सर्वांस सारखेंच लेखलें, तर चांगल्या कामास उत्तेजन मिळूं शकत नाहीं आणि उत्पादनाची क्रिया मंदावते असा त्यांचा अभिप्राय आहे. ह्या बाबत त्यांनीं तपशीलवार चर्चा केली आहे ती सद्यः परिस्थितींत, भरभराट ओसरून मंदीची जाणीव होऊं लागली असतांना, अत्यंत मौल्यवान् अशीच आहे. आपल्या कामगारविषयक कायद्यांचे बाबतींत पाश्चात्य राष्ट्रांचें अंधानुकरण न करतां, आपल्या गरजा व परिस्थिति ह्यांचेशीं ते जुळते केले पाहिजेत, असें त्यांनीं सांगितलें आहे. औद्योगिक ट्रायब्यूनल्सना अर्थशास्त्राचे साधे नियमहि माहीत नसतात. जास्त काम आणि जास्त उत्पादन ह्यांच्याशीं त्यांनीं वेतनाची सांगड घालावयास हवी; पण ते कामगाराला लाडावून सामाजिक न्यायाच्या नांवाखालीं सोन्याचें अंडें घालणाऱ्या कोंबडीचाच बळी घेत आहेत, असें श्री. ठाकूर ह्यांनीं निश्चयपूर्वक मत व्यक्त केलें आहे. सामाजिक न्यायाच्या कल्पनांची परिस्थितिनुरूप छाननी केली पाहिजे; उत्पादनवाढीविना बाकी व्यर्थ




ठरेल. इतरहि आनुषंगिक अशा महत्त्वाच्या कित्येक प्रश्नांची चर्चा श्री. ठाकूर ह्यांनीं केली आहे. निसर्गावर मात करून त्याचेकडून अधिकाधिक उपभोग्य जिनसा मिळविण्यासाठीं व त्यामुळें रहाणी सुधारण्यासाठीं कष्टांची व खडतर तपश्चर्येची आवश्यकता आहे. कष्टाखेरीज रहाणीचा दर्जा सुधारणें कदापि शक्य नाहीं. श्री ठाकूर ह्यांनीं श्रमांचें महत्त्व स्पष्ट शब्दांत व्यक्त करून आपल्या प्रयत्नांस वास्तववादी बनविण्याचा दिलेला संदेश वर पासून खालपर्यंत पोचला पाहिजे. देशाच्या उद्धारासाठीं सर्वांच्याच श्रमांची जरूरी आहे; श्रीमंतांनीं श्रमाबरोबर, आपल्या साध्या गरजा भागवून उरणारा सर्व पैसा भांडवलाचे द्वारा नव्या संपत्तीच्या उत्पादनासाठीं आपण होऊन उपलब्ध करून दिला पाहिजे. नाहींतर त्याची सक्ति करावी लागेल. अशा अनेक पिढ्यांच्या श्रमामुळें व त्यागामुळेंच कोणत्याहि देशास उज्ज्वल काळ प्राप्त होत असतो.

---

## महाराष्ट्रांतील बँकांचें एकत्रीकरण

### श्री. जोग ह्यांचा खुलासा

संपादक ‘ अर्थ ’ यांस

स. न. वि. वि. ‘ अर्थ ’ च्या दिवाळी अंकांत “ महाराष्ट्रांतील बँकांचें एकत्रीकरण ” या विषयासंबंधीं मी आपले विचार मांडले. हेतु हा कीं, ह्या प्रश्नावर सर्वांगीण चर्चा व्हावी. त्याप्रमाणें त्यावर बरीच चर्चा होत आहे हें पाहून मला बरें वाटलें. या चर्चेंतून उपस्थित होणाऱ्या मुद्यांस मी पुढें सविस्तरपणें उत्तरें देईनच.

आज येवढेंच स्पष्ट करावयाचें आहे कीं, माझ्या लेखांत ज्या बँकांचा नामनिर्देश झाला आहे किंवा ज्यांच्या एकत्रीकरणाची सूचना केली गेली आहे त्यांवर किंवा त्यांच्या चालकांवर व संचालकांवर कुठल्याहि तऱ्हेची टीका करण्याचा उद्देश नाहीं व नव्हता. अशा बँकांची स्थिति वाईट आहे किंवा महाराष्ट्रांत हा धंदा धोक्यांत आला आहे असा अर्थ त्यांत मुळींच ध्वनित नाहीं, किंवा तसा कुठल्याहि प्रकारें कुठल्याहि ठेवीदारांना धोक्याचा इशाराहि नाहीं. तेव्हां तसा गैरसमज कोणी करून घेऊं नये. कुठल्याहि लेखांत प्रतिपादनासाठीं आंकड्यांची आवश्यकता लागते व त्यासाठींच महाराष्ट्रांतील आठ प्रमुख अशा शेड्यूल्ड बँकांचे आंकडे केवळ उद्बोधक म्हणून घेतले आहेत. एकत्रीकरणासाठीं याच बँकांवर भर देण्याचा मुळींच उद्देश नव्हता. आपल्या प्रांतास मोठ्या बँकांची जरूरी आहे कीं नाहीं नि असल्यास तीं कशा प्रकारें घडवून आणतां येईल नि साधारण तिचें स्वरूप नि मर्यादा कुठपर्यंत जाऊं शकतील याची कल्पना येण्यासाठीं त्या आंकड्यांचा व बँकांचा निर्देश केला आहे. तरी हा खुलासा आपण प्रसिद्ध करावा, ही विनंति.

आपला,

ता. १०–११–१९५२. चिं. वि. जोग.

## महाराष्ट्रीय बँकांना विनंति

लेखकः—ल. म. जोशी, बी. कॉम्. ( मुंबई ), सर्टि. ए. आय. बी. ( लंडन ), सर्टि. ए. आय्. आय्. बी., मुंबई.

ता. २२-१०-५२ च्या "अर्थ"च्या दिवाळी अंकांतील "महाराष्ट्रीय बँकांना विनंती" या मथळ्याखालील श्री. जोग यांचा लेख वाचला.

त्यांचा त्यांतील हेतु स्तुत्य आहे, याबद्दल कोणासही शंका घेण्याचें कारण नाहीं. मी स्वतः कोठल्याही बँकेच्या अधिकार-पदावर नाहीं. माझ्याहीकडून मी या विषयावर थोडा विचार केला आहे व माझ्या पूर्वीच्या कांहीं लेखांतून ते विचार मांडले आहेत. तेव्हां, आपल्या अल्पमतीला वाटतात ते विचार स्पष्ट मांडून जर त्यांच्या योजनेला कांहीं मदत होत असेल तर करावी, या एकाच हेतूनें पुढील विचार मांडण्याचें धाष्टर्य मी करीत आहे. हीं माझीं स्वतःचीं मतें आहेत.

राजस्थानांतील प्रयोगासंबंधीं श्री. जोग यांनीं आपल्या विनंतींत उल्लेख केला. तें माझ्याही वाचनांत आलें; पण त्यावरून मी असा बोध घेतला कीं या बँकांचें एकीकरण श्री. जोग म्हणतात त्या-प्रमाणें सुखासुखी होत नसून त्यांची एकमेकांतील गळेकापू स्पर्धा व ठेवीवर दिलेला भरमसाठ व्याजाचा दर हीं पापेंच कारणीभूत आहेत. कदाचित् माझें चुकीचें असेल; पण हें ओघानें आलें म्हणून त्याचा येथें जातां जातां उल्लेख केला, येवढेंच. वादाचा मुद्दा हा नसल्यामुळें या मुद्याला विशेष महत्त्व मी न देतां पुढें जात आहे.

श्री. जोग यांची एकत्रीकरणाची सूचना अगदीं गोड आहे. त्यांनीं सांगितलेले फायदेही गणितानें योग्य असेच आहेत, पण ही सध्याच्या घटकेला तरी "कविकल्पना" आहे, असें म्हण-ण्याचें धाडस मी केलें तर त्याचा गैरसमज होणार नाहीं अशी मी आशा बाळगतों.

यास अगदी आपल्या व्यवहारांतऊंच उदाहरण आपण घेऊं-या. एकत्र कुटुंबपद्धतीचे फायदे कोणी नाकारले कां (खर्चाच्या दृष्टीनें अं!)? ते काय थोडे कां आहेत? पण विश्वबंधुत्वाच्या लांब लांब गप्पा मारणारे सख्खे भाऊ व त्यांची मंडळी गुण्या गोविंदानें राह्यला कबूल आहेत, अशी किती उदाहरणं सध्यां सांपडतील? स्वतंत्र बिऱ्हाड करून राह्यचं, पण जरूर पडेल तेव्हां एक होऊन एकमेकांना मदत करायची हा सुवर्णमध्यच साधणारे कितीतरी निघतील. यामध्यें प्रत्येकाचं प्रिय असलेलं स्वातंत्र्य अबाधित रहात असतं, ही ग्यानबाची मेख आहे! सेंटिमेंट्स्, व्यक्तित्व, या गोष्टी शिवाय निराळ्याच!!

हीच उपमा पुढें थोडीशी ओढून महाराष्ट्रांतील सध्यांच्या बँकांना लावण्यासारखी आहे.

आज महाराष्ट्रांत, त्यांनींच सांगितल्याप्रमाणें, बऱ्याचशा बँका आपला धंदा स्वतंत्र रीतीनें करीत आहेत. कोणाची राजस्थानां-तील बँकांप्रमाणें गळेकापू स्पर्धा नाहीं, वाईट हेतु अगर मत्सर एकमेकांबद्दल नाहीं, कांहीं नाहीं. पण त्या जरूरीच्या वेळीं संसारांतील उदाहरणाप्रमाणें एकत्र येऊन एकमेकांस मदत करायला तयार व्हावयास पाहिजेत. व या दृष्टीनें त्यांचें संघीकरण जरी आपण करूं शकलों तरी एका महत्त्वाच्या टप्प्यापर्यंत आपण येऊन पोंचलों, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या दृष्टीनें विचार करूं लागल्यास या निरनिराळ्या बँका कां निघाल्या, कोणी काढल्या, त्यांस भांडवल कसं मिळालं, ठेवी कशा आणल्या गेल्या, बँका काढतांना त्यामागें कोणती भावना होती, याचें विवेचन मोठें मनोरंजक ठरेल असें मला वाटतें.

बँक स्थापन करणारे चतुर, धोरणी, व्यवहारदक्ष, कर्तबगार इ. इ. तर खरेंच; पण त्यांनीं यावर कितीतरी विचार रात्रंदिवस केला असेल; त्यास आपल्या कष्टाचं व अमोल वेळाचं खतपाणी घालून तिचें जिवापलीकडे जतन केलें असेल; त्यास लागणारा त्रास व दगदग कितीतरी सोसली असेल; जिवाचं रान किती करावं लागलं असेल, याची कल्पना ज्यांनीं हें काम अंगावर घेऊन केलें असेल, त्यांस मुख्यत्वेंकरून व इतरांस सहज करतां येण्यासारखी आहे. त्यांना आपण ही कल्पना सुचवली तर ते म्हणतील, "बाबांनो, आमच्या भावना तरी कांहीं लक्षांत घ्याल कीं नाहीं? भले आम्ही लहान असूं, पण "ही आमची बँक" म्हणून कितीतरी जणांनीं तिला वाढविण्यास मदत केली, त्या गांवची ती एक अभिमानाची गोष्ट होऊन बसली. लुळं, पांगळं, लंगडं, लुकडं, असलं तरी जिनं त्याला वाढवलं त्या आईला तें मूल प्रियच असतं ना? ही भावना असल्यामुळें, बँक—मग ती कितीका लहान असेना—स्वतः वाढविली असल्यामुळें विलीनी-करण करून तिचं स्वतंत्र अस्तित्व नष्ट करायला तावडतोब (हा शब्द बुद्धिपुरस्सर वापरला आहे) कोणी तयार होईल असं मला वाटत नाहीं.

याच विषयाकडे दुसऱ्या मुद्यावरून बघूं.

बँक सुरू करण्यांत आणखीही कांहीं हेतू असूं शकतील. जसें:—धंद्याच्या दृष्टीनें डोकें चालवून बोर्डातील अर्धी अधिक मंडळी आपल्या बाजूनें ओढून घेऊन सबंध बोर्ड झुलवायचें व आपली जागा कायम राहील अशी व्यवस्था करावयाची. जीवनाचा प्रश्न असल्याकारणानें यांत कांहीं गैर आहे असा येथें मुद्दा नसून असा एक हेतु असण्याचा संभव आहे येवढेंच येथें निदर्शनास आणावयाचें आहे. यश, कीर्ति, पैसा व मान हा असा आयुष्यभर टिकविणें शक्य होत असतें.

याचप्रमाणें, बँकेमध्यें अनायसें आलेलें भांडवल आपल्या खाजगी धंद्यांत कर्ज म्हणून घेऊन उपयोगांत आणावयाचें हाही एक प्रधान हेतु कांहीं ठिकाणीं असूं शकतो. अशाच प्रकारचे आणखीही कांहीं निराळे हेतु असूं शकतील. अशा परिस्थितींत व्यावहारिक दृष्ट्या विचार केल्यास केवळ भावनेस बळी पडून स्वार्थत्याग करायला, आपलं स्वातंत्र्य व हातांतला "चलता घोडा" सोडायला कोणी तयार होईल असं मला तरी वाटत नाहीं!

तेव्हां येवढें उच्च ध्येय बाजूस ठेवून सध्याच्या घटकेंत निदान सर्वांनीं एकत्र जमून धंद्यांमध्यें जी निरनिराळीं अंगें व उपांगें आहेत यासंबंधीं खेळीमेळीच्या वातावरणांत विचार करून त्यांत कुठपर्यंत आपण एक होऊं शकतों हें बघावें या दृष्टीनें पुढील सूचना मांडीत आहे.

१. डेक्कन बँक्स असोसिएशन सध्यां आहे. तिच्या कक्षेंत महाराष्ट्रांतील सर्व बँका सभासद म्हणून येत असतील तर ठीकच; नाहीं तर त्यांच्यापैकीं तज्ज्ञ व इतर बँकांतील १–२ या विषयांतले तज्ज्ञ व आदरणीय असे इसम घेऊन त्यांची एक तात्पुरती कमिटी नेमावी. तिनें सर्व बँकांस या बाबत लिहून चांचणी करावी व त्यांत असें सर्व बँकांचें संमेलन भरविलें गेल्यास मुख्यत्वेंकरून कोणकोणत्या विषयांवर आपण सर्व एक होऊं शकूं याबद्दल विचारणा करावी.

२. हें झाल्यावर सर्व बँकांची एक कॉन्फरन्स (कॉमेल अगर

इन्फॉर्मल) भरवून त्यांत त्या सर्व विषयांचा उहापोह व्हावा व कॉमन विषयांवर ठराव व्हावे.

३. ह्या ठरावास अनुसरून एका विशिष्ट मुदतीपर्यंत (२अगर ३ वर्षे) सर्वांनीं सहकार्य यावें व ठरावांची अंमलबजावणी करून करावी.

४. हें बरोबर पाळलें जात आहे कीं नाहीं, कोणास काय अडचणी येतात, त्या कशा दूर करतां येतील, यासंबंधीं विचार करण्याकरितां म्हणून एक ॲडव्हायसरी कमिटी स्थापन करावी. म्हणजे या अनुभवाचा फायदा मिळेल व पुढील वेळीं योग्य त्या सुधारणा करितां येतील.

५. असोसिएशननें हें कार्य केल्यास वेगळी फी आकारावयास नको. पण तें शक्य नाहींच झालें तर सर्व सभासदांकडून त्यांच्या नफ्यावर कांहीं प्रमाणांत फी म्हणून घ्यावी व यांतून हा सर्व खर्च चालावा.

६. खालील विषयांवर सर्व बँकांचें एकत्रीकरण होऊं शकेल असा अंदाज आहे.

(अ) हा वेळ पावेतों सर्व बँकांची रिझर्व बँकेतर्फे तपासणी झाली असेलच. त्यांनीं ज्या निरनिराळ्या खात्यांतून निरनिराळ्या सूचना केल्या, त्यांतील सर्वसाधारण महत्त्वाच्या अशा सूचना घेऊन, त्या अमलांत आणण्याकरितां जी माहिती लागते त्यांचे, अगर इतरही दृष्टीनें कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीनें जी माहिती लागते त्यांचे, सर्व स्टॅण्डर्ड फॉर्म्स करावेत व त्याप्रमाणें सर्व बँकांनीं चालावें.

(ब) सर्व बँकांचे मिळून व्हॅल्युएशन एक्स्पर्ट, आर्किटेक्ट व एंजिनियर्स, सॉलिसिटर, बॅलन्सशीट स्क्रुटिनायझर्स व स्टॅटिस्टिकल डेटा भरणारे लोक हे सर्व कॉमन असावेत. यांत प्रत्येक बँकेला खर्च कमी येईल; पण माहिती पूर्ण मिळेल. तज्ज्ञांचा फायदा मिळेल. कर्जाकरितां ठराविक ठशांत मागविलेला अर्ज कोणत्याही बँकेकडून आला तरी यांची चारें भराभर फिरून कायदा, व्यवहार, बाजारचा नूर, या दृष्टीनें पक्कें काम झटपट होईल; पैसे हातांतून गेल्यानंतर येणारे हिशेबनिसांचे शेरे चुकवितां येतील व कायद्यांत कच्चे पडलों म्हणून कर्ज वसूल होऊं शकलें नाहीं असा बोल कोणाला घ्यायला नको. मोठीं कर्जें देतांना कायद्यांच्या व इतरही बारीक सारीक किचकट गोष्टींवर आगाऊच अभिप्राय आल्याकारणानें हें काम सुकर व्हावें असें वाटतें.

(क) सर्व बँकांनीं आपले ड्राफ्ट्स्, हुंड्या, वटावाचे, कमीशनचे दर एक ठरवून घेतले तरी ठीक होईल. (सध्यां आहेतच, पण त्यांतही कांहीं सुधारणा हवी असल्यास त्यांच्या पुरती त्यांस करितां येईल). ठेवींवरीलही व्याजाचा दर शक्यतर एक ठेवतां येईल. म्हणजे ठेवीदारांची इकडून तिकडे निष्कारण धांवपळ चुकेल.

(ड) शाखा उघडण्यासंबंधींही सोयीस्कर रीतीनें विचार करतां येईल.

(इ) महाराष्ट्रांतील सर्व बँकांचें एकमत झाल्यास कोणत्याही खातेदारास महाराष्ट्रांतील कुठल्याही बँकेच्या कुठल्याहि शाखेंत जाऊन कोणत्याही बँकेच्या खातीं त्याच्या खात्यांत जमा करण्याकरितां योग्य कमिशनवर पैसे भरतां येतील. यांत खातेदारास समाधान व सर्व बँकांनीं आपल्याला केवढी सर्व्हिस दिली याबद्दल त्याला अभिमान वाटल्यावाचून खास रहाणार नाहीं. याचें पद्धतीवर इथल्या येथेंच ट्रॅव्हलर्स चेक्स सारखी पद्धतही सुरू करतां येऊं शकेल व आणखीही इतर दृष्टीनें योग्य ती मदत मिळूं शकेल.

(ई) लहान लहान कर्जें ज्या त्या बँकांस स्वतःच्या अनुभवावरून देतातच; परंतु फार मोठें कर्ज एखाद्या गिऱ्हाइकास हवें असलें व तें त्या बँकेच्या आवाक्याबाहेरचें असलें तर फार मोठा प्रश्न उत्पन्न होतो. अशा वेळीं सर्व बँका एक होऊन खालीलप्रमाणें व्यवस्था करणें शक्य आहे.

समजा, माझी बँक लहान आहे व एकाद्यास १० लाख रुपये कर्ज हवें आहे. कर्जदार तुमचा खातेदार असल्यामुळें तुम्हांस पूर्ण माहीत आहे. त्याची सर्व माहिती काढून तारणासंबंधीं जें काय घ्यावयाचें त्यासंबंधीं आपला वर नमूद केलेला स्टॅण्डर्ड फॉर्म भरून आला व सर्व एक्स्पर्टस्कडून जाऊन त्याची पूर्ण छाननी होऊन कर्ज द्यावयाचें ठरलें. अशा वेळीं ज्या ज्या बँकांच्या जवळ इन्व्हेस्टमेंट करण्यास शिल्लक पैसा आहे अशा बँकांनीं, ज्यावेळीं असें सर्क्युलर पाठवून कोण किती इन्व्हेस्टमेंट करावयास कबूल आहे अशी पृच्छा केली जाईल त्यावेळीं तो आंकडा त्यांच्या नांवासमोर लिहून पाठवायचा. हा सर्व मिळून आंकडा झाला की ज्यांनीं ज्यांनीं जे जे पैसे कबूल केले त्याप्रमाणें त्यांच्याकडून चेक्स मागवून ते पैसे कर्जदाराला द्यायचे.

इन्शुअरन्सच्या सर्प्लस् ट्रीटी बेसिसवरच हें आधारलेलें आहे. पण यांत प्रथम पैसे द्यावे लागतात व हळुहळूं वसूल करायचे असतात. व्याजाचाही हिशेब तसाच शेंकडेवारीवर (म्हणजे १०% २०% असें) बसविल्यास ज्यास्त सोपें होऊं शकेल.

तुम्हांला जशी दुसरी बँक मदत करील त्याचप्रमाणें तुम्हींही दुसऱ्या बँकेला मदत कराल; व अशा रीतीनें देण्याघेण्याचा व्यवहार क्लीअरींग बेसीसवर घेऊन सेट ऑफ होतील व उरलेले बॅलन्स एकमेकाला एकमेकांच्या बुकांत दाखवितां येईल. यांत संवय होईपर्यंत त्रास वाटला तरी पुढें सोपें होईल. बरं, सर्व कर्ज आमच्या बँकांत दुर्दैवानें खपूं शकलें नाहीं तर एखादी मोठी बँक (सेंट्रल किंवा इंडिया) यांत सामील करून घेऊन तिच्याशीं ऑटोमॅटिक ट्रीटीसारखी व्यवस्था असावी. म्हणजे सर्व दृष्टीनें फायदे होतील. बँकेचें गिऱ्हाईक बँकेजवळ राहील; आपल्या बँकेला जरुरीपुरतें कर्ज देतां आलें; दुसऱ्या बँकांनाही इन्व्हेस्टमेंट झाली. दुसरें, एकाच गिऱ्हाइकाला १०-१५ लाख रुपये देऊन त्याच्या दैवाशीं आपलेंही दैव बांधून घेण्यापेक्षां निरनिराळ्या ५०० इसमांना थोडी थोडी रक्कम दिली जाऊन बुडीत कर्जाचा धोका वाटला जातो; पुष्कळ बँकांच्या पुष्कळ गिऱ्हाइकांशीं संबंध येतो. यामध्यें बारक्या बँकांची फिनॅन्स करण्याची शक्ति वाढेल.

या प्रश्नाबाबत १।२ वर्षांपूर्वींच माझ्या लेखांत मी साधकबाधक उहापोह करून बँक्स असोसिएशनला विनंति केली होती.

(उ) बँकांच्या निरनिराळ्या इन्व्हेस्टमेंटबद्दलहि असेंच एक्स्पर्ट नेमून ट्रीटी बेसीसवर प्रत्येक आयटेमखालीं थोडथोड्या इन्व्हेस्टमेंटस् करतां येतील. व फटका आल्यास "कंबरच मोडली" असें होण्याचें चिन्ह फार कमी राहील.

असो. वर वर विचार करून ज्या कांहीं भल्याबुऱ्या सूचना कराव्याशा वाटल्या त्या स्तुत्य हेतु मनांत धरून अगदीं मोकळ्या मनानें केल्या आहेत. कोणास या संबंधांत याहीपेक्षां चांगल्या सूचना करतां येतील.

विचारांस पुढें चालना देण्यास मदत केली येवढा जरी यांतून निष्कर्ष निघाला तरी मला समाधान वाटेल.

### सावणाच्या कारखान्यांच्या अडचणी

भारताचे उद्योग व व्यापारमंत्री श्री. टी. कृष्णम्माचारी नुकतेच दक्षिण भारताचा दौरा करून परतले. द. भारतामधील साउथ इंडिआ सोप मेकर्स असोसिएशनतर्फे त्यांना एक खलिता सादर करण्यांत आला असून, त्यांत साबणाच्या कारखान्यांना येत असलेल्या अडचणींकडे लक्ष वेधण्यांत आलें आहे. ही संस्था मद्रास, त्रावणकोर–कोचीन, म्हैसूर आणि हैदराबादमधील मोठ्या साबणाच्या कारखानदारांची प्रातिनिधिक आहे. खलित्यांत असें म्हटलें आहे कीं, भारतामधील साबणाच्या धंद्याला १९४९–५० व ५१ सालीं बराच धक्का पोचलेला आहे. एक तर साबणासाठी लागणारा कच्चा माल दुर्मिळ झाला आहे, शिवाय त्या मालाच्या किंमतीही भरमसाठ वाढल्या आहेत. त्यांतच परदेशी बाजारपेठांची वाण आणि स्वदेशी गिऱ्हाइकांची आटलेली खरेदिशक्ति ह्यांची भर पडली आहे. त्यामुळें पुष्कळ कारखान्यांना आपल्या उत्पादनांत कपात करावी लागली अगर ते तात्पुरते बंद ठेवावे लागले. ज्या धंद्यांच्या उभारणीसाठी परकीय भांडवलाची गरज आहे त्यांत परकीय भांडवल गुंतविलें जाण्यास हरकत नाहीं. पण, साबणाच्या धंद्याची स्थिति तशी नाहीं. ह्या धंद्यांत पुरेसें भांडवल आणि पाहिजे तितके तंत्रज्ञ असल्यामुळें अधिक कारखाने निघणें इष्ट नाहीं. गेल्या कांहीं दिवसांत खोबरेल तेलाच्या किंमती वाढल्या, पण साबणाच्या विक्रीच्या किंमती वाढूं शकल्या नाहींत. खोबरेल तेलाच्या किंमतीला आळा घालण्याचा एक उपाय म्हणून वायद्याच्या व्यवहारांना बंदी घालण्यांत यावी, त्याचप्रमाणें साबण तयार करण्यासाठी जीं इतर तेलें लागतात तीं भारतांतील कच्च्या मालापासून भरपूर तयार होत असल्यामुळें, त्यांच्या आयातीवरही बंदी घालण्यांत यावी, अशी मागणी भारतीय सरकारकडे करण्यांत आली आहे.

---

### रशिआशीं व्यापार करण्यासाठीं नवी कंपनी

गेल्या एप्रिल महिन्यांत मॉस्को येथें भरलेल्या आर्थिक परिषदेंत ब्रिटिश प्रतिनिधी मंडळानें रशिआशीं कांहीं व्यापारी करार केले होते. हे करार अमलांत आणण्यासाठी ब्रिटनमध्यें एका नव्या कंपनीची स्थापना करण्यांत आली आहे. कंपनीचे अध्यक्ष लॉर्ड बॉइड ऑर हे आहेत. कंपनीचें नांव इंटर नॅशनल ट्रेडर्स असोसिएशन लि. असें असून तिच्या संचालक मंडळावर पांच डायरेक्टर्स आहेत. त्यांपैकीं एक हुजूर पक्षाचा सभासद आहे. आतांपर्यंत ज्या व्यापारी सौद्यांना बोर्ड ऑफ ट्रेडची संमति मिळाली आहे अगर ज्यांना परवानगी देण्यांत येईल, अशा दोन्ही प्रकारच्या सौद्यांत मिळून १·४ कोटी पौंडांचा व्यवहार होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या रकमेंत आयात–निर्यात दोन्ही व्यापारांचा समावेश आहे. ब्रिटननें जर्मनी, चीन, रुमेनिया, पोलंड, इत्यादि राष्ट्रांकडून माल घ्यावयाचें ठरविलें आहे. त्याशिवाय झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी आणि बल्गेरिआ ह्या देशांबरोबर व्यापारी वाटाघाटी चालू आहेत असें समजतें. कम्युनिस्ट राष्ट्रांना कापड, कच्ची लोकर, कृत्रिम रेशीम, सूत कांहीं यंत्रसामुग्री, इत्यादी प्रकारचा माल पुरविण्यांत आला आहे. मॉस्कोमध्यें गेलेल्या ब्रिटिश व्यापारी प्रतिनिधींनीं एकूण सुमारें ५·२ कोटी पौंड मालाचा व्यवहार करण्याचें ठरविलें होतें. निर्यात करावयाच्या मालापैकीं एक तृतीयांश माल आतांपर्यंत पाठविण्यांत आला असून उरलेला लवकरच धाडण्यांत येईल अशी उमेद संचालक मंडळाला वाटत आहे. पूर्व–युरोप आणि प. युरोप ह्यांच्यामधील व्यापार थंडावल्यामुळें होणारी उभयपक्षीं कुंचबणा नाहींशी करण्याच्या कामांतील हें पहिलें पाऊल असावें, असें वाटतें.

---


### मुंबई राज्य सहकारी बँकेच्या राहुरी शाखेची वार्षिक सभा


दिनांक २७–१०–५२रोजीं मुंबई राज्य सहकारी बँक लि.च्या राहुरी शाखेची चवथी वार्षिक साधारण सभा, तेथील विद्यामंदीरमध्यें श्री. मुरलीधर सदाशिव पाटील केंदल बु॥ यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. त्यावेळीं बँकेचे मॅनेजर श्री. गायतोंडे, सी. इन्स्पेक्टर श्री. बूच, तसेंच नगर डिस्ट्रिक्ट बँकेचे मॅनेजर, चेअरमन व डायरेक्टर श्री. बार्शिकर, वगैरे अधिकारीवर्ग हजर होता. राहुरी शाखेच्या कार्यक्षेत्रांतील सुमारे चाळीस सोसायट्यांचे प्रतिनिधी आणि चेअरमन, सेक्रेटरी व इतर सहकारी मिळून तीनशें लोक हजर होते. तालुक्यांतील सोसायट्यांच्या सभासदांची प्रचलित दुष्काळी परिस्थिति, बँकेचें शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जवसुलीबाबतचें धोरण आणि त्याचे सभासदांवर होणारे इष्टानिष्ट आर्थिक परिणाम, या गोष्टींवर बरीच चर्चा करण्यांत आली. त्याबद्दलचें बँकेचें धोरण काय आहे व काय राहील यासंबंधीं श्री. गायतोंडे यांनीं समर्पक मार्गदर्शन केलें.

नंतर जमलेल्या सर्व अधिकारी वर्गाचे तसेंच सहकारी मित्रांचे श्री. बूच, सीनीयर इन्स्पेक्टर, नगर विभाग यांनीं आभार मानल्यानंतर हारतुरे व अल्पोपहार होऊन सभा बरखास्त झाली.

दि व्हल्कन इन्शुअरन्स
कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

किर्लोस्कर
पॉवरवर चालणारे
वसंत नं. ३ चरक





" शरद चरक "
उसाचे चरक
अधिक माहिती मागवा.
किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी

## नगर येथें प्रो. धनंजयराव गाडगिळांचें भाषण

अहमदनगर जिल्हा सहकारी दिनोत्सवसमितीतर्फे सहकारी दिनानिमित्त नगर सेंट्रल बँकेच्या हॉलमध्यें प्रो. धनंजयराव गाडगीळ यांचें व्याख्यान झालें. अध्यक्षस्थान नगरचे जिल्हाधिकारी श्री. फत्तेसिंहजी राणा यांनीं स्वीकारलें होतें.

को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांचे नगर जिल्ह्याचे असिस्टंट रजिस्ट्रार श्री. रा. ह. देशपांडे यांनीं नगर जिल्ह्यांतील सहकारी संस्थांची व चळवळीची थोडक्यांत माहिती सांगून जिल्ह्यांत सहकारी संस्थांची कसकशी वाढ होत आहे हें समितीतर्फे प्रसिद्ध करण्यांत आलेल्या पत्रकाद्वारें निदर्शनास आणलें. सर्वांत जुने सहकारी कार्यकर्ते श्री. त्र्यं. गं. धनेश्वर यांनीं सहकारी तत्त्वाबद्दल विवेचन करून तिसाव्या सहकारी दिनाचा जाहीरनामा, ठराव व श्री. आर. जी. सरय्या यांचा आलेला संदेश वाचून दाखविला. सदर ठराव सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला.

प्रो. गाडगीळ यांनीं आपले भाषणांत सहकारी चळवळीकडे सरकारनें व जनतेनें नव्या दृष्टीनें पाहण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. सहकारी चळवळ ही नुसती चळवळ म्हणून त्यांत भाग घेण्यापेक्षा नवीन जीवन व्यवस्था सहकारी तत्वावर आधारभूत व्हावी म्हणून प्रत्येकानें अहर्निश खटपट करणें कसें अगत्याचें आहे हें व भारताचा उत्कर्ष त्याशिवाय होणार नाहीं व तशी खटपट आत्मीयतेनें सर्वांनीं केल्यास यश आल्याशिवाय राहाणार नाहीं, असा दृढ आशावाद व्यक्त केला. सभेचे अध्यक्ष श्री. राणा यांनीं समारोप करून सहकारी संस्थांतून तयार होत असलेल्या मालाच्या प्रदर्शनाचें उद्घाटन झाल्याचें जाहीर केलें. दिनोत्सवसमितीचे अध्यक्ष श्री. बार्शीकर यांनीं सर्वांचे आभार मानले.

समारंभानिमित्त समितीतर्फे १-११-१९५२ ते ३१-१०-५३ या मुदतीचे व जिल्ह्यांतील सहकारी संस्थांची माहिती व चित्रें दर्शविणारें कॅलेंडर प्रकाशित करण्यांत आलें.

---

### प्रो. पाणंदीकरांचें व्याख्यान

पुणें येथें ह्या महिना अखेर भरविण्यांत यावयाच्या बँकिंग-विषयक प्रदर्शनाचें उद्घाटन शेठ प्राणलाल देवकरण नानजी ह्यांचे हस्तें होणार आहे. दोन व्याख्यानांपैकीं एक व्याख्यान डॉ. एस. जी. पाणंदीकर ह्यांचें होणार असून त्यांच्या व्याख्यानाचा विषय "स्वातंत्र्यप्राप्तीपासून आजपर्यंतची हिंदी जॉइंट स्टॉक बँकिंगची प्रगति" असा आहे. शेठ प्राणलाल व प्रो. पाणंदीकर हे इंडियन बँकिंग असोसिएशनचे अनुक्रमें चेअरमन व सेक्रेटरी आहेत.

---

### सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास, भोर

भोर रेल्हे भागांतील सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी, सहकारी कार्यकर्ते, दह. फा. पास झालेले किंवा इंग्रजी पांच इयत्ता शिक्षण झालेले होतकरू विद्यार्थी, यांचेकरितां भोर येथें सहकारी शिक्षण-वर्ग दि. २० नोव्हेंबर, १९५२ ते ५ जानेवारी, १९५३ अखेर होणार आहे. तरी वर्गाचा फायदा घेऊं इच्छिणाऱ्यांनीं वर्गाची फी तीन रुपये व अर्ज मे. एजंट, पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., भोर, येथें दि. २०-११-५२ पर्यंत आणून द्यावेत, असें मे. को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर कळवितात.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३०-६-५२ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४-,९२५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,७९,००० |
| ठेवी | रु. | ७१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८३,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



दि

**युनायटेड कमर्शिअल बँक लि.**

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६७½ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका, व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या, व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या संबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.


हें पत्र पुणें, फे. शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८०३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.